## निशाण क्र. ४७ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी याने कागदपत्र दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार, सदरील कामी दाव्याचे संदर्भात महत्वाचे कागदपत्र न्यायालयात हजर करावयाचे आहेत. सदरचे कागदपत्र हे न्यायपुर्ततेच्या दृष्टीने महत्वाचे असे आहेत. त्यामुळे न्यायदानास मदतच होणार आहे. तरी सदर कागदपत्र हजर करणेस परवानगी मिळावी, अशी प्रस्तूत वादी याने विनंती केली आहे.

२. प्रतिवादी ने सदर अर्जास म्हणणे दाखल केले आहे. त्याच्या म्हणण्यानुसार, अर्ज खोटा व खोडसाळ आहे. प्रतिवादीस तो मान्य नाही. सबब वादीचा अर्ज फेटाळणेत यावा अशी विनंती प्रतिवादीने केली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांचे तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. सदर कागदपत्र हे वाद विषयाशी संबंधित आहेत असे दिसून येते. प्रस्तुत वादी यांना हे कागदपत्र दाखल करण्यास परवानगी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्या सारखे होईल असे वाटते. परिणामी त्यांचे कशानेही भरून न येणारे अपरिमित नुकसान होईल असे वाटते. याउलट अशी परवानगी मंजूर केल्यास प्रतिवादीचे कसलेही नुकसान होईल असे वाटत नाही. सदरचा दावा हा ठराव व निरंतर ताकीदीकरीता आहे. सदर कागदपत्र दाखल करण्यास परवानगी दिल्यास वाद विषयाचे गुणावगुणावर निवारण होण्यास मदतच होणार आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस क्रमप्राप्त आहे असे वाटते. परिणामी खालील आदेश पारीत करीत आहे :

# आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : देवगड
दिनांक : १६/१०/२०१९

( बी.आर.पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

Digitally signed by Balkrishna Rajaram Patil
Date: 2019.10.17 17:46:31 +0530